संक्षिप्त फौ. ख. क्र. ४२७/२०२३
सरकार -वि.- उत्तम मंडल
नि.क्र. ७ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | गजेंद्र हरीभाऊ चौधरी, |
| वय | – | ४८ वर्षे, |
| व्यवसाय | – | सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, |
| राहणार | – | जिल्हा वाहतुक शाखा, ता.नागपूर ग्रा., जि.– नागपूर. |

**सरतपासणी–सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.मोरे यांचे मार्फत** –

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. दिनांक २६.०९.२०२३ रोजी मी स्थानीक गुन्हा अन्वेशन शाखा नागपूर ग्रामीण येथे पो.ह. म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी, पो.ह. भगत व पो.शि. लांजेवार यांच्यासह उमरेड भिवापूर परिसरात पेट्रोलिंग करत होतो. त्यावेळी मुखबीरव्दारे खबर मिळाली की, नांद येथून एक व्यक्ती पोळगाव मार्गे नायलॉन पिशवीमध्ये दारु घेऊन जाणार आहे. त्यानंतर मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९** देण्यात येते. त्यानंतर आम्ही पंचांसह नांद पोळगाव रोड येथे गेलो. तेथे एक व्यक्ती येताना दिसला. त्याला थांबवून त्याचे नाव विचारता त्याने त्याचे नाव उत्तम मंडल असे सांगितले. त्याच्या अक्टव्हाचा नं.एम.एच.४०-बी.डब्ल्यू-७२३० असा होता. त्याच्या गाडीवर १८० मि.ली.च्या देशी दारुच्या ४८ निपा मिळून आल्या. त्याला परवाना विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर जप्त केलेल्या निपांपैकी एक १८० मि.ली.ची निप वेगळी काढून रासायनिक परिक्षणाकरिता सिलबंद केली त्यानंतर त्या निपा जप्त करुन घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०** देण्यात येते. त्यानंतर सी.ए.फार्म तयार केला. आता मला दाखवलेला सी.ए. फार्म तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

त्यास **नि.क्र.११** देण्यात येते. त्यानंतर पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१३** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे आहे की, मला स्थानिक पंचांचे नाव नसते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी पेट्रोलिंग करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचांचे नाव माहिती नसल्यामुळे मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सी.ए. परिक्षणाकरीता एक बॉटल वेगळी काढली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सी.ए. परिक्षणाकरिता पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी केसेसचा टार्गेट पुर्ण करण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक १०.०३.२०२६